महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

१	व्यवसाय अभ्यासक्रमाचे नांव	सी.सी.इन पूर्व शिवणकला (Pre Tailoring) (410120)
२	तुकडी निहाय विद्यार्थी संख्या	२५ विद्यार्थी
३	अभ्यासक्रमाचा कालावधी	६ महिने
४	प्रकार	अंशकालीन (Part Time)
५	आठवडयातील कामाचे दिवस	६ दिवस
६	प्रती दिवस कामाचे तास	४ तास
७	अभ्यासक्रमासाठी आवश्यक जागा	प्रॅक्टीकल लॅब = २०० चौरस फूट वर्गखोली = २०० चौरस फूट एकूण = ४०० चौरस फूट
८	प्रवेश अर्हता	साक्षर
९	प्रस्तावना व उद्दिष्ट	(1) सुशिक्षित बेरोजगारांनी शिवणकाम क्षेत्रात शिरुन दैनंदिन वापराचे कपडे घरच्याघरी शिवण्याचे कौशल्य आत्मसात करणे. (2) असे कपडे शिवण्याचा स्वयंरोजगार सुरु करणे. (3) अन्य शिंप्याकडे नोकरी करण्यासाठी आवश्यक ते कौशल्य आत्मसात करणे.
१०	रोजगार संधी	**(अ)** कपडे शिलाईचा व्यवसाय स्वत: सुरु करणे. **(ब)** (1) तयार कपडयांच्या कारखान्यात कर्तक किंवा शिवण कामगार म्हणून नोकरी करणे. (2) अन्य शिंप्यांकडे नोकरी करणे.
११	शिक्षकांची शैक्षणिक अर्हता	(1) माध्यमिक शालान्त परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि (2) महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळाच्या खालील परीक्षा उत्तीर्ण :- शिवण कर्तन शिक्षक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण किंवा शिवण भरतकाम शिक्षक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण किंवा जुना टी.टी.एन. "अ" किंवा "ब" विभाग उत्तीर्ण. किंवा Diploma in Dress Designing & manufacturing
१२	शिक्षण पध्दती	**Training System Per Week** सैध्दांतीक: ६ तास प्रात्यक्षिक: १८ तास एकूण: २४ तास
१३	परीक्षा पध्दती	

Sr. No.	Paper Code	Name of Subject	TH/PR	Hours	Max. Marks	Min. Marks
1	**41012021**	Basic Knowledge of Cutting & Stitching	PR- I	6 hrs	200	100
2	**41012022**	Basic Sewing	PR- II	6 hrs	200	100
		Total Marks			**400**	**200**

Practical - I Basic knowledge of cutting & stitching

१.	शिवणकामास लागणा-या साहित्याची माहिती व उपयोग, विविध प्रकारच्या कात्र्या / टाचण्या, बेतचाक, शिंप्याचा खडू, मापाचा टेप, पेन्सिल, सुया, अंगुस्तान, आकृती टेबल, बाही फळा, शिवण दोरे, रेशमी दोरे, इस्त्री, शिंप्याचा काटकोन, फ्रेंच कर्व्ह, इत्यादी.
२.	शिवणयंत्राची काळजी व निगा -- शिवणयंत्राच्या निरनिराळया भागांचे उपयोग, विशिष्ट कामासाठी करावयाचे बदल, निरनिराळया प्रकारच्या कामासाठी शिवण-यंत्राच्या निरनिराळया उपकरणांची माहिती. कपडयानुसार दाब, ताण व टाके यांची व्यवस्था.
३.	निरनिराळया शिवणीची माहिती. (सीम). उदा.-- साधी शिवण, तुरपाईची शिवण, गोम टाक्याची शिवण, सपाट शिवण, इत्यादी.
४.	शिवणकामाच्या उपयोगात येणा-या मुलभूत टाक्यांची माहिती व अभ्यास. उदा.-- सरळ टाके, धाव टाके, तुरपाईचे टाके, बुडते टाके, जाळीचे टाके, तिरपे टाके, इत्यादी.
५.	कपडे दुरुस्तीची माहिती. ठिगळ जोडणे, रफू करणे, डाग काढणे, जुन्यातून नवीन करणे, इत्यादी.
६.	गळ, फास (हुक, आय) लावण्याची व निरनिराळया प्रकारच्या बटणांची माहिती. शो-बटणे, काज, फास बनविणे, कलाबूत व अंतर्गत पट्टया जोडणे, फिती व काठपट्टया लावणे, इत्यादी.
७.	कपडे सुंदर दिसण्यासाठी नेहमी वापरण्यात येणारे शोभेचे टाके. उदा.-- साखळीचे टाके, पिसाचे टाके, जाळीचे टाके, गव्हाचे टाके, इत्यादी.
८.	वेगवेगळया प्रकारच्या चुणी -- (१) जिरावाची चुण (गॅदरींग), (२) जाळीची चुण (स्मॉकींग), (३) मधपोळयाची चुण (हनीकोम), (४) दुमडीची चुण (टक्स), (५) घडीची चुण (प्लेटींग), (६) झालरीची चुण (फ्रिलींग).
९.	मापे घेण्याच्या निरनिराळया पध्दती व त्यांचा उपयोग, निरनिराळया कपडयांसाठी लागणा-या मापांची माहिती.
१०.	निरनिराळया कपडयांसाठी कागदी नमुने कापणे व कापडाची काटकसर होईल अशा पध्दतीने ते नमुने कापडावर व्यवस्थित मांडणे. (ले-आऊट).
११.	शिवलेल्या कपडयातील दोष व त्यांची दुरुस्ती.
१२.	प्रमाणित मापाने (स्केलने) आकृती काढण्याची माहिती.
१३.	निरनिराळया आकाराचे गळे, कफस् कॉलर्स, बाह्या वगैरेंच्या आकृती काढण्याची माहिती.
१४.	बाजारात मिळणा-या लोकप्रिय कापडाची माहिती व गुणधर्म, कपडा आकसविण्याची माहिती. उदा. -- सुती, तागी, रेशमी, लोकरी आणि कृत्रिम.

Practical - II Basic Sewing

१.	बिनबाहीचे झबले, नाडीचे झबले.
२.	बॉनेट.
३.	बीन पायाची चड्डी.
४.	घट्ट पायाची चड्डी.
५.	साधी चड्डी.
६.	पेटीकोट (घेराचा) व खांद्यावरील पट्टीचा.
७.	बाबा सूट (चड्डी व शर्ट)
८.	बेबी फ्रॉक (योकचा)
९.	फ्रॉक (चुणीचा, प्लेअर्ड, अंब्रेला, "ए" लाईन्स).
१०.	प्लेटींचा स्कर्ट.
११.	स्कर्ट ब्लाऊज (बाहीचा).

१२.	चोळी फॅशन ब्लाऊज.
१३.	कटोरी ब्लाऊज.
१४.	स्कूल युनिफॉर्म (मुलीचा शालेय गणवेश)
१५.	साडी पेटीकोट (सहाकळी परकर).
१६.	सलवार.
१७.	खमीस (पंजाबी).
१८.	गाऊन योकचा (स्त्रियांचा -- वन पीस).
१९.	सुरवार.
२०.	नेहरु शर्ट.
२१.	हाफ शर्ट (फुल ओपन, ओपन कॉलर).
२२.	मॅनिला शर्ट (फुलबाही, शेक्सपीअर कॉलर).
२३.	नाडी-बटण पायजमा.
२४.	हाफ पॅन्ट (बेल्ट व प्लेटींसह).
२५.	फुल पॅन्ट (बेल्ट व प्लेटींसह).

८. प्रस्तुत अभ्यासक्रमासाठी लागणारे साहित्य.

अ. क्र.	तपशील			संख्या
१.	पाय शिवणयंत्रे (५ विद्यार्थ्यांकरीता एक हयाप्रमाणे)	..	..	६
२.	कात्र्या (३० सें.मी.लांबी)	..	..	२
३.	विजारपेट्टी व काटकोन	..	..	१
४.	बनात घातलेली आकृति टेबल (मिल्टन क्लॉथ) (१२० सें.मी. x ७५० सें.मी. x ९० सें.मी.)	..	..	२
५.	स्टूले (३० सें.मी.व्यास x ४५ सें.मी.उंची)	..	..	६
६.	कर्तन टेबल (१२० सें.मी. x ७५० सें.मी. x ९० सें.मी.)	..	..	१
७.	इस्त्री	..	..	१
८.	ब्रश	..	..	४
९.	आरसा (४५ सें.मी. x ३० सें.मी.)	..	..	१
१०.	फळा (९० सें.मी. x ३० सें.मी.)	..	..	१
११.	शिक्षकांकरीता टेबल व खुर्ची	..	..	१
१२.	मापाचा टेप	..	..	१
१३.	चार्ट (किमान ४)	..	..	

अभ्यासक्रमास लागणारी संदर्भ पुस्तके.

(१) शास्त्रोक्त शिवणकला, भाग १ ते ४
लेखक -- श्री. के. एम. हेगडे, पुणे.

(२) व्यवसायिक शिवण-कर्तनकला व अध्यापनशास्त्र (मराठी, हिंदी).
लेखक -- श्री. रा. के. व्यवहारे, मुंबई.

(३) सुबोध शिवणशास्त्र
लेखक -- श्री. प्र. ल. नंद, पुणे.

(४) झारापकर शिवणशास्त्र
लेखक -- श्री. का. रा. झारापकर, मुंबई.

(५) शास्त्रोक्त शिवणकला मार्गदर्शन
लेखक -- श्री. म. गो. जुमळे, नागपूर.